**MHKO050026152014**

| | | |
|---|---|---|
| | **<u>नियमित दरखास्त क्र. २१/२०१४ मधील निशाण २७ व २८ खालील आदेश</u>** | **संजीवनी शिवगोंडा पाटील, वगैरे**<br>**वि.**<br>**शामराव रामा वडर, वगैरे** |

**१.** प्रस्तुतचे अर्ज दरखास्तदार यांनी मयत वि.प. क्र.१ शामराव रामा वडर यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ होवून वारस अभिलेखावर घेणेसाठी दिलेले आहेत.

२. दरखास्तदार यांचे असे कथन आहे की, वि.प. क्रमांक १ हे दिनांक ०९/१०/२०२० रोजी मयत झाले आहेत. दरखास्तदार ही वयस्कर महीला आहे. दरखास्तर हिला वि.प. क्रमांक १ यांच्या वारसांची माहीती वेळेत मिळाली नाही. दरखास्तदार हिने दिनांक ०८/११/२०२२ रोजी वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज दिला होता परंतू त्यामध्ये मृत्युची तारीख चुकली असल्याने पुन्हा प्रस्तुतचे अर्ज दाखल केले आहेत. दरखास्तदार याने जाणुन बुजून विलंब केलेला नाही. सबब दरखास्तदार हिने झालेला विलंब माफ हावून मयत वि.प. नं. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

**२.** वि.प. यांनी प्रस्तुत अर्जांना म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणे विना निकाली काढण्यात येत आहे.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतची दरखास्त ही रे.क.नं. ९५/२००६ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दाखल केली आहे. दरखास्तदार यांनी प्रस्तूतच्या दरखास्तीमध्ये वि.प. क्र. १ यांच्या विरुध्द दादी मागीतलेल्या आहेत. दरखास्तदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २४/०८/२०२३ रोजी दाखल केला असून वादी यांनी मयत वि.प. नं. १ शामराव रामा वडर यांचा मृत्यु दाखला प्रस्तुत कामात नि. २२ सोबत दाखल केला आहे. त्यामुळे दरखास्तीचा गुणदोषावर निकाल करण्यासाठी सर्व पक्षकार हे दाव्यात सामील असणे

आवश्यक आहेत. त्यामुळे सर्व वारसांना पटलावर घेणे आवश्यक आहे. उलटपक्षी वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दरखास्तीची अंमलबजावणी निकाली होणेसाठी मदतच होणार आहे. त्यामुळे वि.प. क्र. १ चे वारसांना वारस रेकार्डवर आणणेस झालेला विलंब माफ करुन वि.प. नं. १ चे वारस अभिलेखावर घेणे उचित ठरेल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज नि. २७ व २८ मंजूर करणेत येतात.

२. दरखास्तदार यांना वि.प. क्र.१ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येतो.

३. दरखास्तदार यांनी वारस अभिलेखावर घेवून तशी दुरुस्ती करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.09.23 11:09:58 +0530

**इचलकरंजी**
**दिनांक–२१/०९/२०२४**

**(संजय दि. वानखेडे)**
**४थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी.**